झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
दिनाक :१०.६.२००४

साद्र

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या बाराव्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळण्याबाबत.

प्राधिकरणाची बारावी बैठक दि.७.६.२००४ रोजी मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखाली मा.मुख्यमंत्री यांचे दालन, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करून मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
१०/६

मा. प्रधान सचिव (गृहनिर्माण)
10/6/2004

मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

बाब क्र.१२/१ :

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

## दि.७.६.२००४ रोजी झालेल्या १२ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| अ.क्र. | बैठकीस हजर असलेले सन्माननीय सदस्य | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री.सुशिलकुमार शिंदे, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | श्री.सय्यद अहमद, मा.गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ३. | श्री.नबाब मलिक, मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ४. | श्री.अरूण कुमार मागो, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | सदस्य |
| ५. | श्री.रामानंद तिवारी, मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग | सदस्य |
| ६. | श्री.डॉ.सुरेश जोशी, मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग | सदस्य |
| ७. | श्री.आर.सी.जोशी, मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग | सदस्य |
| ८. | श्री.जॉनी जोसेफ,मा.आयुक्त, बृ.मुं.म.न.पा. | सदस्य |
| ९. | श्री.चंद्रशेखर प्रभू, | सदस्य |
| १०. | डॉ.डी.एन.महाजन | सदस्य |
| ११. | श्री.सुंदर बुरा | सदस्य |
| १२. | श्री.शिरिष पटेल, वास्तुविशारद | सदस्य |
| १३. | श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर, मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य | विशेष निमंत्रित |
| १४. | श्री.महादेव देवळे, मा.महापौर, बृ.मुं.म.न.पा. | विशेष निमंत्रित |
| १५. | श्री.मधु चव्हाण, अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण | विशेष निमंत्रित |
| १६. | श्री.उज्ज्वल उके, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सदस्य |

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे आगमन झाल्यानंतर प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्र्याचे व इतर सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. मा.मुख्यमंत्री यांनी बैठक सुरू करण्याबाबत आदेशीत केले.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची ११ वी बैठक दि.२६.११.२००२ रोजी संपन्न झाली व ११ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी सभागृहापुढे सादर केले.

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी कार्यवृत्तांत स्थायी करण्यापूर्वी काही सूचना व बदल आहेत काय असे विचारले असता मा.सदस्य श्री.चंद्रशेखर प्रभू यांनी कार्यवृत्तातील बाब क.११/१४ धारावी कृती योजना राबविण्याबाबतचे विषयावरील इतिवृत्ताचे पान क्र.६१ वरील "असे केल्यास आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा धारावीत नियोजन स्तरावर निर्माण

करता येईल " असे नमूद केले आहे. सदर उल्लेख चुकीचा असून इतिवृत्तातून वगळण्यात यावा. त्यामुळे वरील ओळी इतिवृत्तातून सर्वानुमते वगळण्यात येवून कार्यवृत्तास मंजूरी देवून स्थायी करण्यात आले.

बाब क्र.१२/२ :

विषय : सन १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यांना मंजूरी व स्विकृती देण्याबाबत.

वरील विषयाबाबत पार्श्वभूमी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी स्पष्ट केल्यानंतर डॉ.डी.एन.महाजन यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, आज रोजी २००४-२००५ हे आर्थिक वर्ष सुरू असतांना सन १९९६-१९९७ पासून वार्षिक लेख्यांचे लेखा परिक्षण झालेले नाही, ही बाब स्पृहणीय नाही. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, या प्राधिकरणाचे सन १९९६-९७, ९७-९८-९८-९९ पर्यंतचे लेखा परिक्षण पूर्ण झालेले आहे व लेखा परिक्षणाने घेतलेले आक्षेपांचे नियोजनही करण्यात आलेले आहे. यापुढे प्राधिकरणाची बैठक लवकरात लवकर घेवून प्रत्येक वर्षाचे लेखा परिक्षण प्राधिकरणासमोर सादर करण्याची तजवीज ठेवण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केल्यानंतर सर्वानुमते चर्चा होवून सदरहू बाब मंजूर करण्यात आली.

बाब टिप्पणी : १२.३

विषय : सन २००२-२००३ च्या प्रत्यक्ष खर्चास, सन २००३-२००४ चे सुधारित अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्च तसेच सन २००४-२००५ चे अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

वरील विषयाबाबत परिच्छेद-२ मधील सन २००४-२००५ या वर्षासाठी जाहीरात व जनसंपर्क रू.३.०० कोटीची तरतूद केली आहे. या रक्कमेचा विनियोग नक्की कशासाठी करण्यात येणार आहे. असा मुद्दा डॉ.महाजन यांनी उपस्थित केला. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर बाबतीत असे निदर्शनास आणून दिले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे कार्यालय लोकाभिमुख असल्यामुळे या कार्यालयातील चालू असलेल्या योजनेबाबत जनमानसात जेवढी जास्त प्रसिध्दी करता येईल त्याचा जास्तीत जास्त फायदा प्राधिकरणास होईल. डॉ.महाजन यांनी असे सुचविले की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने अलिकडेच चांगली प्रगती केली आहे व त्याबाबत प्रसिध्दी देणे गरजेचे आहे. याबाबत सर्वानुमते एकमत झाले व सन २००२-२००३ चा प्रत्यक्ष खर्च २००३-

२००४ चे सुधारित अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्च तसेच सन २००४-२००५ चे सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली.

<u>बाब टिप्पणी : १२.४</u>

<u>विषय</u> : मुंबईची विस्तारीत उपनगरे म्हणजेच पी.आर.एस. व टी विभाग येथे पुनर्वसन व विक्री घटकाचे प्रमाण १:१.३३ करणे.

सदर बाब पुढे ढकलण्यात आली. (deffered).

<u>बाब टिप्पणी : १२.५</u>

<u>विषय</u> : झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील २०.९० चौ.मी.पेक्षा जास्त चटई क्षेत्र असलेल्या संरक्षणास पात्र असलेल्या बांधकामाच्या बदल्यात अशा बांधकामधारकास २०.९० चौ.मी. क्षेत्राच्या वरील अतिरिक्त क्षेत्रफळ कमी दराने देण्याबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत घोषित गणनाकृत झोपडपट्टी क्षेत्रामध्ये कोणतेही बांधकाम (tolerated) असल्यास व अशा बांधकामाचे अस्तित्वात असलेले चटई क्षेत्र २०.९० चौ.मी. (२२५ चौ.फूट) या पेक्षा जास्त असल्यास व अशी बांधकामे बृहन्मुंबई महानगरपालिके व्दारा संरक्षणास पात्र असलेल्या (tolerated) वर्गात मोडत असल्याबाबतचे आवश्यक ते कागदोपत्री पुरावे (मुंबई महानगरपालिकेकडील मालमत्ता कर विभागाचा दाखला नगर भूमापन नकाशाची मूळ प्रत, इत्यादी) त्या बांधकामधारकाने/संस्थेने सादर केल्यास, अशा बांधकामधारकास २०.९० चौ.मी. (२२५ चौ.फूट) चटई क्षेत्रास अनुसरून असलेल्या बांधकाम क्षेत्रापेक्षा अतिरिक्त क्षेत्र, त्या अतिरिक्त बांधकामासाठी व त्यास अनुसरून असलेल्या पुनर्वसन घटकाच्या बांधकामासाठी (reconstruction) येणारा प्रत्यक्ष खर्च तसेच सदर क्षेत्रासाठी शासनास प्रदान करावयास लागणारे विविध आकार उदा..मेंटेनंन्स डिपॉझिट, पायाभूत सुविधा आकार इत्यादी व बांधकाम खर्चावर २५% नफा एवढया अतिरिक्त किंमतीस योजनेच्या विकासकाकडून प्राधान्याने विकत घेता येईल व सदर किंमतीस असे संरक्षणास पात्र असलेल्या (tolerated) बांधकामाचे अतिरिक्त क्षेत्र त्या बांधकामधारकास देणे विकासकावर बंधनकारक राहील. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत व या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी

बांधकाम खर्चाचे प्रत्यक्ष दर वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना नेमून द्यावेत.

याबाबत श्री.चंद्रशेखर प्रभू यांनी असे सांगितले की, या ठरावात फक्त वाणिज्य वापराच्या जागेचा विचार करण्यात आलेला आहे. तसेच २२५ चौ.फूट पेक्षा जास्त असलेल्या निवासी गाळे आहेत व जो ठराव tolerated structure म्हणून केला आहे. अशा स्ट्रक्चरला २२५ चौ.फूट मोफत जागा द्यावी व २२५ चौ.फूटापेक्षा जास्त जागेसाठी प्रत्यक्ष बांधकामाचा खर्च अधिक २५ टक्के नफा देवून त्यांना देण्यात यावे याचा अवलंब निवासी जागेकरिता ही व्हावा. तसेच बृहन्मुंबईतील जे मूळ रहिवाशी बृहन्मुंबई येथील कोळीवाडा येथे राहतात, त्यांची प्रत्यक्षात जागा ७५० चौ.फूट ते १०० चौ.फूट पर्यंत आहे आणि जी स्लममध्ये मोडत नाहीत अशा बाबतीत शासनाने ३३(७) खाली ७५० चौ.फूट उपलब्ध करून देण्याबाबत जो नियम केलेला आहे त्याचा याबाबतीत अवलंब करता येईल किंवा कसे याचाही विचार व्हावा असे श्री.नवाब मलिक यांनी सुचविले. प्रधान सचिव, गृहनिर्माण यांनी याबाबतीत असे सांगितले की, वरील कोळीवाडे जर स्लममध्ये येत असतील तर स्लम धोरणाचा फायदा त्यांना मिळेल आणि स्लम मध्ये मोडत नसेल तर त्याचा विचार होणार नाही. मा.मुख्यमंत्री यांनी याबाबत असे सुचित केले की, बृहन्मुंबईतील सर्व कोळीवाडयांची बृहन्मुंबई महानगरपालिकेने सर्व माहिती संकलित करून अशा जास्त क्षेत्रफळाच्या जुन्या निवासी बांधकामाचे बाबतीत योग्य तो निर्णय घेण्याचे दृष्टीने सदर बाब पुढील बैठकीत सादर करावी.

**बाब टिप्पणी : १२.६**

<u>विषय</u> : संपूर्ण धारावीच्या पुनर्विकासाबाबत शासन निर्णय क्र.झोपुयो-२००३/प्रक१८१/झोपसु-१अे, दि.४.२.२००४ नुसार धारावी विकास आराखडा व मुंबई विकास आराखडा- तत्सम फेरबदल.

शासनाने ठराव क्र.झोपुयो-२००३/प्र.क्र.१८१/झोपसु-१अे, दि.४.२.२००४ नुसार संपूर्ण धारावी विभागाच्या नियोजित सुधारीत विकास आराखडयानुसार विकास करणे कामी व मुंबईतील इतर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत/झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रांतर्गत/घोषित झोपडपट्टी क्षेत्रात/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या ३७(१-व) व इतर योग्य त्या कलमाखाली मुंबईच्या विकास आराखड्यात आवश्यकतेनुसार फेरबदल, सुधारणा इत्यादी करण्याचे प्रस्ताव मांडण्याचे झोपडपट्टी पुनर्वसन

प्राधिकरणाचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येत आहेत.

बाब टिप्पणी : १२/७

विषय : शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांनी दिंडोशी, गोरेगांव (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी केलेला खर्च, मुंबई महानगरपालिकेस देय असलेल्या पायाभूत सुविधा आकाराच्या रकमेमधून शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना प्रदान करणेबाबत.

शिवशाही पुनर्वसन प्रकल्प म. या शासकीय कंपनीने दिंडोशी, गोरेगांव (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी म्हणजेच १८.३० मीटर रूंदीचा विकास नियोजन रस्ता बांधणे व त्यामध्ये पाण्याची पाईप लाईन टाकणे या पायाभूत सुविधांसाठी केलेला खर्च, त्या खर्चाच्या रास्ततेबाबत, मुंबई महानगरपालिकेकडून छाननी करून घेऊन, पायाभूत सुविधा आकारापोटी, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प म. यांनी झो.पु.प्रा.कडे भरणा केलेल्या रकमेमधून शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना अदा करावा व तसे मुंबई म.न.पा.स कळविण्यात यावे. असा ठराव मंजूर करण्यात आला.

बाब टिप्पणी : १२/८

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत आतापर्यंत झालेल्या कामाचा प्रगती अहवाल.

या बाबबाबत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत आतापर्यंत झालेला प्रगती अहवाल वेळोवेळी प्राधिकरणास सादर करावा. याकरिता वेळोवेळी बैठका घेवून सविस्तर माहिती सादर करावी, असे सुचित करण्यात आले.

बाब टिप्पणी : १२/९

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील पात्र झोपडीधारकांना ओळखपत्र देण्याबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील पात्र झोपडीधारकांना ओळखपत्रे देण्याची कार्यवाही स्पृहणीय आहे. यापुढे ज्या सदनिकांमध्ये अनधिकृत व्यक्ती वास्तव्यास आहेत, त्यांचे विरूद्द झोपडपट्टी पुनर्वसन कायदयाच्या कलम ३३ अन्वये निष्कासनाच्या कार्यवाहीबाबत सक्षम

अधिकारी यांचेमार्फत निष्कासनाची कार्यवाही प्राधिकरणामार्फत चालू आहे. तिच कार्यपध्दती यापुढे नियमितपणे चालू ठेवण्यास मान्यता सर्वानूमते देण्यात आली.

बाब टिप्पणी : १२/१०

विषय:- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या ज्यादा/अतिरिक्त निधीवर (Surplus fund) आयकरापासून सुट मिळणेसाठी भांडवली गुंतवणूक करणेबाबत.

सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री/अध्यक्ष झो.पु.प्रा.यांनी मान्यता यापूर्वीच दिलेली आहे. सदर बाब प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये सर्व सभासदांना अवगत करण्यासाठी ठेवली आहे. त्यास सर्व सभासदांनी सहमती दिली.

## आयत्या वेळी घेण्यात आलेले विषय

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यालयीन शब्द संक्षिप्त चिन्ह (Logo) यास प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबत.

ठराव

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने National Institute of Design Ahmedabad या राष्ट्रीय पातळीवरील नामांकित संस्थेकडून या कार्यालयाचे शब्द संक्षिप्त चिन्ह (**Logo**) संकल्पित करून घेतलेला आहे. त्यास मा.मुख्यमंत्री/अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी मान्यता दिलेली आहे. सदरची बाब सभासदांना अवगत होण्यासाठी बैठकीत सादर करण्यात आलेली आहे. सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय : महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या आदेशा विरूध्दचे कलम ३५ नुसार सादर केलेल्या अपिलाची सुनावणी घेण्याचे अधिकार प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांना प्रदान करण्याबाबत.

ठराव

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

यांनी दिलेल्या निर्णयाच्या विरूध्दच्या अपिलाची कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाचे अधिकार प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांना प्रदान करण्यास मान्यता देण्याच्या ठरावावर चर्चा होवून अशाप्रकारचे अधिकार प्रदान फक्त न्यायालयीन आदेशान्वये उदभवणाऱ्या परिस्थितीतच करण्यात यावे. त्यामुळे सदर प्रस्ताव न्यायालयीन आदेशान्वये उदभवणाऱ्या प्रकरणांच्या हद्दीपर्यंत सर्वानुमते मान्य करण्यात आला. मात्र सरसकटपणे प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करणे योग्य नाही. त्यामुळे इतर सर्व बाबींवर सर्वकष चर्चा करून तसा प्रस्ताव प्रधान सचिव, गृहनिर्माण यांचेमार्फत सादर करावा. त्यावेळी त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

वरील सर्व बाबींवर चर्चा झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी सभा समाप्त केल्याचे घोषित केले.

000